PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sanshay Kallol
Year: 2013

Song: Nakalat Vinale Jate Jale
Lyricist: Vaibhav Joshi

नकळत विणले जाते जाळे
नकळत गुंतत जाते मन
जिवलग होते कुणी तरी अन्
स्वत:स परके होते मन
नकळत विणले जाते जाळे
नकळत गुंतत जाते मन
जिवलग होते कुणी तरी अन्
स्वत:स परके होते मन
हे नाते कोणते
हे धागे कोणते
कुणी फुलते दूरवर
दरवळते इथे मन
अलगद नव्या रंगात न्हाते धरा
अवचित कसा होतो खुला पिंजरा
सहजच येते साद नभाची
सहज पाखरू होते मन
जिवलग होते कुणी तरी अन्
स्वत:स परके होते मन
हे नाते कोणते
हे धागे कोणते
कुणी फुलते दूरवर
दरवळते इथे मन
मौनातूनी झरते जसे चांदणे
शब्दातले जाते कुठे बोलणे

मौनातूनी झरते जसे चांदणे
शब्दातले जाते कुठे बोलणे
कोण छेडते अबोल तारा
अबोल कैसे वाटे मन
जिवलग होते कुणीतरी अन्
स्वत:स परके होते मन

केव्हातरी येतात लहरी अशा
रेंगाळती वाळूत लाटा जशा
केव्हातरी येतात लहरी अशा
रेंगाळती वाळूत लाटा जशा
क्षणभर दिसतो एक किनारा
क्षणभर वेडे चळते मन
जिवलग होते कुणी तरी अन्
स्वत:स परके होते मन
हो... हे नाते कोणते
हे धागे कोणते
कुणी फुलते दूरवर
दरवळते इथे मन
नकळत विणले जाते जाळे
नकळत गुंतत जाते मन
जिवलग होते कुणी तरी अन्
स्वत:स परके होते मन

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*